Historicity Research Journal Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN : 2393-8900 Volume - 2 | Issue - 12 | August – 2016

# यादव राजघराण्याच्या पतनाची मीमांसा

**प्रा. डॉ.सरवदे सुशीलकुमार शंकरराव**
इतिहास विभाग प्रमुख, तेरणा महाविद्यालय,उस्मानाबाद.

## प्रास्ताविक-



देवगिरीचे सेऊन किंवा यादव यांनी इ. स. ८५० ते १३१८ असे समुारे ४७५ वर्षे दक्षिण पथावर सुरुवातीला मांडलिक म्हणून व नंतर स्वतंत्रपणे राज्य केले. तुंगभद्रा नदीपासून ते नर्मदेपर्यंतच्या मध्यल्या पट्टयात त्यांचे राज्य मोडत असे. त्यांच्या राज्यात महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि मध्य प्रदेशाच्या काही भागाचा समावेश होता. देवगिरी उर्फ दौलताबाद हे त्यांचे प्रमुख सत्ताकेंद्र होते. प्रारंभीच्या काळात यादव हे राष्ट्रकूट व कल्याणीच्या चालुक्याचे मांडलिक होते. पुढे चालुक्य सत्ता क्षीण झ ााल्यानंतर यादवांनी आपले स्वतंत्र्य राज्य घोषित केले आणि सिंघन दुसरा याच्या काळापासून ते स्वतंत्र सत्ता म्हणून वावरु लागले.

सेऊन घराणे यदुकुलापासून निर्माण झाले असल्यामुळे त्यांना यादव असे म्हटले जाते. या घराण्याचे खरे नाव सेऊन असे आहे, असा दावा जॉन केडी यांनी केला आहे.[१] या घराण्याचे प्रारंभीचे शिलालेख आणि होयसळ, काकतीय व कल्याणी चालुक्याच्या शिलालेखात या घराण्याचा उल्लेख सेऊन असा सापडतो.[२] सेऊन हे नाव या घराण्यातील दुसरा राजा सेऊनचंद्र याच्यापासून निर्माण झाले आहे असा प्रा. मुर्ती यांचा दावा आहे. केडी यांनी सुध्दा त्यास दुजोरा दिला आहे. जॉन फ्लिट यांनी कर्नाटकातील शिलालेखांचा अभ्यास करुन द डायनॅस्टिज ऑफ कॅनरिज डिस्ट्रीक्ट ऑफ बॉम्बे प्रेसिडेंसी हा ग्रंथ लिहिला.[३] फ्लिट यांचा हा ग्रंथ ते मुंबई राज्यात धारवाड येथे कलेक्टर असताना त्यांनी केलेल्या शिलालेखांच्या अभ्यासावर आधारलेला आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आरंभीच्या काळापासून १३१८ पर्यंतच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे.

यादव काळ हा तीन टप्प्यात विभागता येतो. पहिला काळ हा नाशिक जिल्हयातील त्यांच्या विस्तारावा काळ होता. पुढे यादवांनी भिल्लम व सिंघनदेवाच्या काळात देवगिरी ही त्यांची राजधानी बनली. यादव काळातील रामदेवराव यादवांचा काळ हा एकाच वेळी उत्कर्ष व अवनतीचा काळ ठरला. कारण यादव जेंव्हा यशाच्या परमोच्च शिखरावर होते तेव्हा खिलजी सुलतानांस त्यांच्या वैभवाचा हेवा वाटत होता. या मत्सरापोटी त्यांनी आपली राजकीय सत्ता यादवांच्या पतनासाठी वापरली. गुप्तहेरांकडून प्राप्त माहितीच्या आधारे अल्लाउद्दीन खिलजीने रामचंद्रदेवाचा पुत्र सहावा भिल्लम ससैन्य राज्याबाहेर गेल्याची योग्य वेळ निवडली आणि सत्ता व समृध्दीच्या शिखरावर असलेल्या यादवांना अकस्मात पतनाच्या प्रतिकूल परिस्थितीस सामोरे जावे लागेल. तथापि यादवांच्या पतनामागे जबाबदार घटकांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

१. **विभागलेला समाज :** चतुर्वर्ग चिंतामणी या हेमाद्रिच्या ग्रंथामध्ये यादवकाळ विभागलेल्या समाजाचे चित्र उमटले आहे. त्यावेळी ६४ हजार व्रतवैकल्ये पाळली जात असत. रुढी परंपरा व अंधश्रद्धांच्या विळख्यात तत्कालीन सरंजामशाही समाज सापडला होता. पानसे म्हणतात, हेमाद्रिरचित प्रायश्चित आणि व्यवहार या दोन खंडामध्ये देवणभट्टाच्या स्मृतिचंद्रिकेमधील काही अवतरणे उध्दृत केलेली आहेत.[५]

२. **अंतर्गत बंडाळी :** रामचंद्रदेव यादवाने अमणदेवाचे क्रूरपणे डोळे काढून सत्ताग्रहण केले होते, परंतु त्याच्या या कृत्यामुळे आरंभापासूनच त्याच्या कटाकरस्थानाचा विरोधात असंतोष होता.[६] दरबारातील काही नेते व सैन्यातील काही अधिकारी असंतुष्ट होते. त्यामुळे रामचंद्रदेव यादवास परचक्राचा सामना करण्यासाठी आवश्यक अशा ऐक्याचा अभाव होता. विभागलेल्या व असंतुष्ट सहकारी वर्गाचे साहाय्य घेऊन आक्रमकाशी लढणे सोपे नव्हते येथेच अल्लउद्दीन खिलजीने शत्रूच्या कमजोरीचा फायदा घेतला.

३. **यादवांचा भाबडेपणा :** आपण जलालुद्दीन खिलजी या चुलत्याशी भांडण करुन आलो आहोत. आपल्या सहकार्याने दिल्लीची सत्ता काबीज करावयाची आहे, अशी बतावणी करुन अलाउद्दीनने रामचंद्र यादवास गाफील ठेवले व अचानक गडावर हल्ला केला.

परिणामी रामचंद्रदेव यादवाचा भाबडेपणा त्यास महागात पडला. घाईगर्दीन शत्रूशी सामना करण्याच्या प्रक्रियेत यादव सम्राट कमी पडले व या धांदलीचा फायदा खिलजी आक्रमकाने घेतला. जय मिळवून परत जाताना हत्ती, घोडे, सोने, चांदी, जड जवाहीर, रेशमी कापड इत्यादी मौल्यवान वस्तूंच्या रुपाने देवगिरीचे अपार द्रव्य दिल्लीस नेले.[७] यादवांच्या पराभवामुळे त्यांची नामुष्की तरच झालीच. शिवाय अपरिमित आर्थिक नुकसानही झाले.

४. **सैन्याची कमतरता :** यादवपुत्र भिल्लम सहावा हा राज्याचे सैन्य घेऊन मोहीमेवर गेला होता. त्याने राज्याचे प्रशिक्षित व सशक्त सैन्य घेऊन मोहीम काढली होती. राज्याचे अधिकृत सैन्य केंद्राच्या बाहेर गेले होते. त्यामुळे रामचंद्रदेव यादवास शत्रुशी मुकाबला करणे अवघड झाले. शत्रूचे सैन्य सुसज्ज आणि रामचंद्रदेव यादव मात्र सैन्याच्या अभावी शत्रुशी लढत होता. त्यामुळे या लढाईमध्ये रामचंद्रदेव यादव हे अपुरे पडले व हा एकाकीपणा त्यांना पराभवाकडे नेणारा ठरला. प्रा. ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, युद्धशास्त्राची व सैन्यातील व्यवस्थेची अक्षम्य उपेक्षा केल्यामुळेच हिंदू परकीयांकडून सतत मार खात आले. उलट तुर्काची दले अश्वदलावर जास्त भर देणारी, त्यामुळे अतिशय वेगवान, त्यांचे सेनापती जास्त कुशल व कार्यक्षम तर हिंदू सैन्ये मंद व सेनापती उदासिन हा असा विषय संघर्ष नेहमी घडून येईल.[८]

५. **अपुरी रसद :** अल्लाउद्दीन खिलजीच्या आकस्मात आक्रमणामुळे रामचंद्रदेव यादवाची धांदल उडाली. गडावर गहू व ज्वारी, दाळीऐवजी मीठाची पोती भरण्यात आली. अशी दंतकथा आहे त्यामुळे रामचंद्रदेव यादव हे दीर्घकाळ शत्रूशी लढू शकले नाहीत. दीर्घकाळ शत्रूशी सामना करण्यासाठी प्रशिक्षित सैन्याचा अभाव आणि त्या जोडीला अन्नधान्याची अपुरी रसद यामुळे शत्रूशी सुसंगत लढाई करणे शक्य झाले नाही. जर यथोचित रसद असेल तर शत्रूशी सामना करणे सोपे झाले असते. या कारणामुळे रामचंद्रदेवास तहाचे बोलणे करावे लागले. यादवाच्या सेनेत हत्तीला फार महत्व होते, परंतु त्यांचा युध्दात फार उपयोग नसे. उलट यौवनी आक्रमकांकडे वेगवान घोडे असत.[९]

६. **कुटनीतीचा अभाव :** यादवकाळातील रामचंद्रदेव यादवाने काशीपर्यंत जाऊन म्लेच्छांचा पराभव केला होता. या विजयामुळे फाजील आत्मविश्वास व अहंकार वाढल्यामुळे रामचंद्रदेवाने गुप्तहेर यंत्रणेकडे लक्ष दिले नाही. शिवाय डावपेचातून मुत्सद्देगिरीने मार्ग अवलंबून शत्रूला दूर ठेवता आले असते पण तसे न करता रामचंद्रदेव यादवाने पडते घेऊन आपली कन्या अल्लाउद्दीन खिलजी यास देऊ केली. ही बाब नैतिकदृष्टीने तत्कालीन समाजाचे खच्चीकरण करणारी ठरली. त्यानंतर सुमारे चार दशकातच यादव सत्ता कोलमडून पडली.

फेरीश्ताने म्हण्टल्याप्रमाणे आपल्या मागून मोठे सैन्य येत आहे, अशी अल्लाउद्दीनने बतावणी केली आणि यादव राजाने ५० मण सोने देऊन त्याच्याशी तह केला.[१०] जर मुत्सद्देगिरी असती तर यादवांना ऐवढी तडजोड करावी लागली नसती.

या सर्व घटकांचा विचार करता यादवांच्या अध:पतनाची कारणमीमांसा शक्य झाली आहे. सुमारे ४७५ वर्षे दक्षिणपथावर अधिराज्य गाजविणाऱ्या यादवांचा पराभव झाला आणि दक्षिण पथावरील अखेरचे हिंदू राज्य संपुष्टात आले. त्यामुळे दक्षिणपथावरील प्रवेशद्वार हे आक्रमकांच्या हाती पडले. त्यानंतर मोहमद बिन तुघकाने दिल्लीहून दौलताबादला राजधानी हलविली. त्यानंतर अनेक आक्रमकांनी दक्षिणेवर चाल केली. यादवांचे पतन हे दक्षिणपथावर आक्रमकाच्या प्रवेशाला कारणीभूत ठरले. जर रामचंद्रदेव समर्थपणे लढला असता तर हे आक्रमण दोन शतके लांबले असते, पण तसे घडले नाही ही एक शोकांतिका म्हटली पाहिजे.

## संदर्भसुची


१. Keay John, India : A History, Atlantic Monthly, २००१-०५-०१-p.२५२-२५७.

२. Kamat Suryanath Upendra, (२००२) A Concise History of Karnataka, Jupiter Books, MCC, Bangalore, P. १४३-१४४.

३. Fleet J.F., The dynastics of the Kanerese Districts of the Bombay Presidency, Gazetteer of Bombay Presidency Vol-१, Part-II, १८९४, p. २०६.

४. Ibid, p. २०७.

५. पानसे मु.ग, यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६३. पृ २४.

६. कित्ता, पृ. ३३

७. Jbbras (NS) (Journal of Bombay Branch of Royal Asiatic Society, Vol.X.Part II,p.१२७.

८. डॉ. देशपांडे ब्रम्हानंद, देवगिरीचे यादव, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, १९७५ पृ १६८.

९. कित्ता, पृ. १६७
१०. कित्ता, पृ.१७३.